Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 05 April 2025
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०५ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं आजपासून श्रीराम नवमी उत्सवास प्रारंभ झाला. हा उत्सव परवा ७ तारखेपर्यंत चालणार आहे. पहिल्या दिवशी आज उत्सवानिमित्त समाधी मंदिरात अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते सपत्नीक श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. यावेळी उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे, मंदीर विभाग प्रमुख विष्णु थोरात आदी उपस्थित होते.

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वक्फ दुरुस्ती विधेयकाला दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्यानंतर अवघ्या काही तासात २ खासदारांनी या विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे, यामध्ये काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद आणि एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांचा समावेश आहे.

मुस्लीमांना त्यांच्या धार्मिक बाबी स्वत: व्यवस्थापित करण्याचा हक्क विधेयकाच्या माध्यमातून हिरावून घेतला जाईल, असा दावा ओवैसींनी आपल्या याचिकेत केला, तर हे विधेयक मुस्लीम समुदायाप्रती भेदभाव करणारं आणि मुस्लिमांच्या मूलभूत हक्कांचं उल्लंघन करणारं आहे, असा दावा खासदार जावेद यांनी याचिकेत केला आहे.

****

एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यासंदर्भात धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत काल ते बोलत होते.

औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक वेगानं करण्यासाठी एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा दिल्यास त्या गावांच्या विकासाबरोबरच संबंधित भागात मूलभूत सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांचा विकास वेगानं होईल. त्याचप्रमाणे पाणीपुरवठा, रस्ते, वीज आणि इतर सुविधा सुधारण्यावर भर दिला जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

जागतिक आर्थिक मंच– वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२५ मध्ये एकूण ६३ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या असून यातील ४७ करार, उद्योगाशी संबंधित आहेत. यातील कंपन्यांना जमीन वाटपाचं काम पूर्ण होत आहे. यासह नवीन औद्योगिक क्षेत्रांसाठी भूसंपादनाची अधिसूचना प्रकाशित करण्यात येत आहे. ई–निविदा पद्धतीनं महाटेंडर्स् पोर्टलवर ६५४ भूखंडाचं वाटप करण्यात आलं असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यातील अनेक भागात गेल्या दोन दिवसांत अवकाळी पाऊस तसंच गारपिटीचा फटका बसला असून, पंचनाम्याचे आदेश संबंधित कृषी विभागाला देण्यात आले असल्याचं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे. नाशिक इथं काल प्रसार माध्यमांशी ते बोलत होते. राज्यातल्या २४ जिल्ह्यांतील ११० तालुक्यांमध्ये २६ ते २७ हजार एकरांवरील पिकं जमीनदोस्त झाली आहेत, त्यामुळं येत्या पुढील चार–पाच दिवसांत आपत्ती व्यवस्थापन विभागासोबत बैठक घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल तसंच पीक विम्याचं पुनर्गठन करण्यात येत असल्याचंही कृषीमंत्री कोकाटे यांनी सांगितलं.

****

रायझिंग लाईफ इंटरप्राईजेस प्रायव्हेट लिमिटेड नांदेड या कंपनीविरुद्ध नांदेडमधल्या भाग्यनगर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपनीत गुंतवणूक केलेल्या नागरीकांनी आणि साक्षीदारांनी भाग्यनगर पोलिस ठाण्यात संपर्क साधून आवश्यक ती माहिती उपलब्ध करून द्यावी, असं आवाहन पोलिस ठाण्याचे निरीक्षक एम. एस. माळी यांनी केलं आहे.

****

इंडीयन प्रमियम लिग क्रिकेटच्या थेट प्रक्षेपणावर मोबाईलद्वारे लोंकाकडून पैसे घेऊन सट्टा खेळणाऱ्या भंडारा जिल्ह्यातल्या खरबी इथल्या आशिष प्रेमजी गिरेपुंजे आणि

मनोज प्रकाश नवखरे या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. भंडारा पोलिसांनी संशयित आरोपी गिरेपुंजे याची पंचांच्या समोर झडती घेतली असता त्याच्याकडे तीन मोबाईल संचासह एकूण ६३ हजार ७१५ रुपयांचं साहित्य आढळून आलं. गणेशपूर इथल्या मनोज प्रकाश नवखरे याच्यासाठी काम करत असल्याची माहिती गिरेपुंजे याने पोलिसांना दिली आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईत, चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांत दुपारी साडेतीन वाजता तर चंदीगड इथं राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्ज या संघांमध्ये सायंकाळी साडेसात वाजता सामना होईल. काल या स्पर्धेत लखनऊ इथं लखनऊ सुपर जायंट्सनं मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी विजय मिळवला.

****

अर्जेंटीना इथं तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताचा चैनसिंह पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोजिशन प्रकारात कांस्यपदक पटकावत अंतिम फेरीत पोहोचला आहे.

****

राज्यात आज हवामान विभागानं वादळाचा इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहावं असं सांगितलं आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील तसंच मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****